K. C. E. Society's
Moolji Jaitha College
'Empowered Autonomous College' Affiliated to
K.B.C. North Maharashtra University, Jalgaon
NAAC Reaccredited Grade - A (CGPA 3.15 - 3rd Cycle)

ESTD. 1945

के. सी. ई. सोसायटीचे
मूळजी जेठा महाविद्यालय
क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नित
'अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालय'
नॅकद्वारा पुनर्मानांकित श्रेणी - 'अ' (सी जी पी ए ३.१५ - तिसरी फेरी)

दि. 03.10.2026

## दुष्काळ ग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क माफी बाबत

**खालील संदर्भीय शासकीय निर्णयातील अटी व शर्तींच्या अधीन राहून शै. वर्ष 2026-27 साठी परीक्षा शुल्क माफी मिळणेबाबत**

**संदर्भ -** 1. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि. 18.10.1993
2. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2 दि. 25.09.2026
3. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग परिपत्रक दि. 1.10.2026

महाविद्यालयात शै. वर्ष 2026-27 मध्ये विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयानुसार शै. वर्ष 2026-27 मध्ये दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचे आदेश प्राप्त झाले असून विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफीसाठी तात्काळ माहिती सादर करावयाची आहे. विद्यार्थ्यांनी यासाठी महाविद्यालयाकडून अर्जाचा नमुना कार्यालयातील खिडकी क्र. 5 वरून प्राप्त करून तो भरून सोबत खालील कागदपत्रासह खिडकी क्र. 4 वर दिलेल्या मुदतीत अर्ज व त्या सोबत असलेली कागदपत्रे जमा करावयाचा आहे. अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावयाची आहेत -

1. सक्षम अधिका-याचा रहिवासी दाखला (बाधित क्षेत्रातील)
2. उत्पन्नाचा दाखला (8 लाखापर्यंत)
3. बँक पासबुक छायांकित प्रत
4. परीक्षा फी भरल्याची पावती
5. चालू वर्षाच्या प्रवेश पावतीची व ओळखपत्राची छायांकित प्रत
6. मागील वर्षाच्या मूळ गुणपत्रकाची सत्य प्रत

**उपरोक्त शासन निर्णयानुसार ही योजना खालील विद्यार्थ्यांना लागु राहणार नाही याची नोंद घ्यावी :-**

1. ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार 100% परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे. (शिष्यवृत्तीधारक पात्र विद्यार्थी)
2. जे विद्यार्थी शासन निर्णयात नमूद केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांशी संबंधित नाहीत.
3. ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांचे वार्षिक उत्पन्न 8 लाखापेक्षा जास्त आहे.
4. जे विद्यार्थी नापास होवून पुन्हा परीक्षेला बसले असतील.
5. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात, नोकरी-धंदा करतात परंतु त्यांच्या नावे गावी शेत जमीन आहे असे विद्यार्थी
6. जे विद्यार्थी बहिस्थ म्हणून परीक्षा प्रविष्ट असतील.

विद्यार्थ्यांनी दुष्काळ ग्रस्त अर्ज जमा करण्याची अंतिम दिनाक ही 15/10/2026 असेल. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

Moolji Jaitha College, Jalgaon • Autonomous • ESTD. 1945

(प्रा. केतन नारखेडे)
प्र. प्राचार्य
मू.जे.महाविद्यालय, (स्वायत्त) जळगाव

Knowledge is Power

Near Samarth Colony, Jalgaon - 425 002. (Maharashtra, India) | Ph. : +91 257 - 2237363, 2234281 | e-mail : mjcollege@kces.in | Website : mjcollege.kces.in
समर्थ कॉलनी जवळ, जळगाव - ४२५ ००२. (महाराष्ट्र, भारत) । दूरध्वनी क्र. : +९१ २५७-२२३७३६३, २२३४२८१ । ई-मेल: mjcollege@kces.in । वेबसाईट: mjcollege.kces.in

# अर्जाचा नमुना (Application Form)

## दुष्काळग्रस्त परीक्षा शुल्क माफी अर्ज (सन २०२६-२७)

**प्रति,**

**मा. प्राचार्य,**

**मू. जे. महाविद्यालय (स्वायत्त) जळगाव**

**अर्जदार विद्यार्थ्याचे नाव:** ____________________ **PRN:** ____________

**वर्ग :** ____________ **रोल नं:** ________ **मोबाईल क्र.:** ____________

**विषय: खालील संदर्भीय शासकीय निर्णयातील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी परीक्षा शुल्क माफी मिळणेबाबत...**

***संदर्भ:*** *१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि. १८.१०.१९९३*

*२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि. २५.०९.२०२६*

*३. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग परिपत्रक दि. ०१.१०.२०२६*

**महोदय,**

मी आपल्या महाविद्यालयात शिकत असून, शासनाने खरीप २०२६ च्या दुष्काळ जाहीर केलेल्या २६५ बाधित तालुक्यांपैकी क्षेत्रातील रहिवासी आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे:

**१. रहिवासी माहिती (शासन निर्णयानुसार):**

गाव (मु. पो.): ____________ तालुका: ____________ जिल्हा: ____________

*(टीप: आपला तालुका शासन निर्णय दि. २५.०९.२०२६ मधील Trigger-१ लागू झालेल्या २६५ दुष्काळी यादीत असणे अनिवार्य आहे)*

**२. आर्थिक स्थिती:** कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न: रु. ____________/- (सोबत सक्षम अधिकाऱ्याचा दाखला जोडला आहे. मर्यादा: ८ लक्ष रुपये)

**३. परीक्षा शुल्काचा तपशील:** भरलेली परीक्षा फी रक्कम: ________ पावती क्र.: ________ दिनांक: ___/___/ २०२६

**४. बँक तपशील (फी परताव्यासाठी - बँक खाते विद्यार्थ्याच्या स्वत:च्या नावे असणे आवश्यक):**

बँकेचे नाव: ____________________ शाखा: ____________________

खाते क्रमांक: ____________________ IFSC कोड: ____________________

**५. चेकलिस्ट (आपल्या माहिती समोर ✓ करा):**

i) आपण या वर्षाचे परीक्षा शुल्क भरले आहे का ? [ ] **होय** / [ ] **नाही**

ii) आपण मागील वर्षी नापास (Repeater) झाला आहात का ? [ ] **होय** / [ ] **नाही**

iii) आपण कोठेही नोकरी किंवा व्यवसाय करता का ? [ ] **होय** / [ ] **नाही**

iv) आपण इतर कोणतीही १००% शिष्यवृत्ती (उदा. शिष्यवृत्ती/फ्रीशिप) घेता का ? [ ] **होय** / [ ] **नाही**

v) आपण चालू वर्षी शिष्यवृत्ती/फ्रीशिप फॉर्म भरणार आहे का ? [ ] **होय** / [ ] **नाही**

vi) आपण मागील वर्षी शिष्यवृत्ती/फ्रीशिप फॉर्म भरला आहे का? [ ] **होय** / [ ] **नाही**

vi) विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष नोकरी/धंदा करतात, परंतु त्यांची जमीन गावात आहे असे विद्यार्थी ? [ ] **होय** / [ ] **नाही**

**६. सोबत जोडलेली कागदपत्रे :**

[ ] परीक्षा फी पावती व परीक्षा अर्जाची प्रत [ ] उत्पन्नाचा दाखला (८ लाखांपर्यंत) [ ] रहिवासी दाखला [ ] चालू वर्षाचे ओळखपत्र (ID Card) [ ] बँक पासबुक झेरॉक्स

**महत्त्वाची सूचना (सदर सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू नाही):** *शासन निर्णयानुसार रिपीटर/नापास, बहिस्थ (External), स्वतः नोकरी/व्यवसाय करणारे, इतर १००% फी सवलत घेणारे व शहरात प्रत्यक्ष नोकरी असलेले पालक यांच्या पाल्यांना ही सवलत अनुज्ञेय नाही.*

---

**हमीपत्र व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र (Undertaking)**

मी, खाली सही करणार विद्यार्थी/विद्यार्थिनी असे प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो/देते की:

१. मी अर्जात दिलेली सर्व माहिती व सोबत जोडलेली कागदपत्रे (रहिवासी, उत्पन्न दाखला इ.) पूर्णतः सत्य व बरोबर आहेत.

२. शासन निर्णय दि. १८.१०.१९९३ व २५.०९.२०२६ मधील निकषांनुसार मी सवलतीस पात्र आहे. मी रिपीटर / बहिस्थ विद्यार्थी नाही अथवा नोकरी करत नाही तसेच इतर १००% शुल्क माफी योजना घेतलेली नाही.

३. भविष्यात पडताळणी दरम्यान सदर माहिती चुकीची, बनावट किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, माझा अर्ज तात्काळ रद्द करण्यात येईल. यामुळे होणाऱ्या कोणत्याही आर्थिक वसुलीस किंवा प्रशासकीय/कायदेशीर कारवाईस मी (विद्यार्थी) स्वतः पूर्णपणे जबाबदार असेन. यात महाविद्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक: _____ / _____ / २०२६ विद्यार्थ्याची सही: ____________

विद्यार्थ्याचे नाव: ____________